



# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २ रा ❑ बुधवार दि.२८ जानेवारी २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# राष्ट्रीय कार्यक्रमांना उपस्थित राहणे घटनात्मक कर्तव्य

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

शिक्षकांसह सर्व शासकीय अधिकारी ,निमशासकीय अधिकारी व सामान्य नागरिकांनी राष्ट्रीय कार्यक्रमांना उपस्थित राहणे देशातील प्रत्येक नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.विशेषत: १५ ऑगस्ट व २६ जानेवारी ला शाळा व महाविद्यालयांमध्ये व शासकीय कार्यालयांमध्ये शिक्षकांसह अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहायला पाहिजे. मात्र बहुतांश शाळा महाविद्यालयांमध्ये व कार्यालयांमध्ये अधिकारी शिक्षकांसह विद्यार्थ्यांची उपस्थिती नगण्य असते ,ही अतिशय चिंताजनक बाब आहे .राष्ट्रीय कार्यक्रमांना उपस्थित राहून आपण आपल्या देशाप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देतो आणि सामाजिक एकता बळकट करतो.

भारतीय संविधानानुसार राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीताचा सन्मान करणे अनिवार्य आहे.राष्ट्रभक्ती वाढवण्यासाठी आणि देशाच्या अखंडतेसाठी अशा कार्यक्रमांमध्ये सहभाग घेणे गरजेचे आहे . अशा कार्यक्रमात सहभाग घेतल्याने लोकशाहीत सहभाग वाढतो.१५ऑगस्ट,२६ जानेवारी विकसित भारत युवा संसद सारख्या उपक्रमांतून तरुणांना राजकारण, प्रशासन आणि राष्ट्रउभारणीमध्ये योगदान देण्याची संधी मिळते .राष्ट्रीय सेवा योजना सारखे कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कार्याची आणि शिस्तीची भावना रुजवतात. राष्ट्रीय कार्यक्रमांना (उदा. स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन) उपस्थित राहणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे घटनात्मक कर्तव्य आहे, जे राष्ट्रप्रेम, एकता आणि अखंडता दर्शवते. अशा उपक्रमांद्वारे संविधानाचा, राष्ट्रध्वजाचा आणि राष्ट्रगीताचा आदर केला जातो, तसेच ऐतिहासिक वारसा आणि आदर्श जपले जातात.

शाळा व महाविद्यालयांमध्ये जे राष्ट्रीय कार्यक्रम आयोजित केले जातात उद्देश हाच की देशातील किशोरवईन व तरुणांमध्ये राष्ट्रीय कार्यक्रमांचे महत्व,देशभक्ती व सांस्कृतिक समृद्धीची जानवी व जागृती निर्माण व्हावी ,हा उद्देश असतो . राष्ट्रीय कार्यक्रम (उदा. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, ) हे देशाची एकता, एकात्मता, देशभक्ती आणि सांस्कृतिक समृद्धी वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. हे कार्यक्रम नागरिकांमध्ये, विशेषतः तरुणांमध्ये, सामाजिक जबाबदारी, शिस्त, नेतृत्वगुण आणि राष्ट्रीय सुरक्षेची भावना निर्माण करतात ते देशाला विकासाच्या दिशेने नेण्यासाठी सामुदायिक भागीदारीला प्रोत्साहन देतात.

राष्ट्रीय एकात्मता आणि एकता: विविध जाती, धर्म आणि संस्कृतीच्या लोकांना एकत्र आणून विविधतेत एकता ही भावना रुजवतात प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्यदिनासारखे कार्यक्रम लोकांमध्ये देशाबद्दलची अभिमानाची भावना जागृत करतात. राष्ट्रीय सेवा योजना सारखे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व कौशल्ये, स्वयं–शिस्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करतात

अशा कार्यक्रमामुळे सामाजिक जागृती निर्माण होते. आरोग्य, साक्षरता आणि पर्यावरण यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर लोकांमध्ये जागरूकता निर्माण करतात

सांस्कृतिक वारसा जोपासला जातो. सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे देशाचा वारसा आणि परंपरा जपण्यास मदत होते. विशेष म्हणजे देशाप्रती सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करणे आणि जबाबदार नागरिक घडवणे असे उदात्त उद्देश व ध्येय राष्ट्रीय कार्यक्रम आयोजित केले जातात.

हे कार्यक्रम केवळ उत्सव नसून, ते देशाच्या प्रगतीमध्ये नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करण्याचे एक प्रभावी माध्यम आहेत.

# रा. स्व. संघ कार्यालय ''मोतीबाग'' येथील ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात

## राष्ट्रीय कीर्तनकार हभप मोरेश्वर बुवा जोशी चऱ्होलीकर यांचे हस्ते ध्वजारोहण

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे –** भारतीय प्रजासत्ताकाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन दिनांक २६ जानेवारी रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ''मोतीबाग'' कार्यालयात सकाळी आठ वाजता अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन भारतीय संस्कृती संवर्धक संस्था यांच्या वतीने करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प. मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली तसेच राष्ट्रगीत व वंदे मातरम् सादर करण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त, या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे ''भव्य घोषवादन'' कार्यक्रम. घोषवादनात संपूर्ण पुणे महानगरातून ६८ वादकांनी सहभाग घेतला. शिस्त, तालबद्धता व राष्ट्रभक्ती याचे प्रभावी दर्शन या घोष वादन कार्यक्रमातून दिसत होते.





संगीत सादरीकरण

घोषवादन कार्यक्रमात पुढील रचनांचे सादरीकरण करण्यात आले. घोष प्रमुख वैभव गाडगीळ हे होते

शंख रचना : प्रतिध्वनी, जगन्नाथ, साकेत

आनक रचना–हंसध्वनी, देशकर

शृंग रचना– राष्ट्रगीत, जयोस्तुते, शिवरंजनी, तिलंग, शिवराज्य, वंदे मातरम् वादकांचा तपशील

एकूण वादक–६८

शंख : १२,आनक : १२, ताल वाद्ये: २ (पणव–१, त्रिभुज–१), स्वरद : १४, तुर्य: १५, नागांग : ७, गोमुख : ४, घोष प्रमुख : १,

आपल्या भाषणात ह.भ.प. मोरेश्वरबुवा जोशी यांनी ''वंदे मातरम्'' या गीताच्या १५० वर्षांच्या इतिहासाचा सविस्तर आढावा घेतला व भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील या गीताचे महत्त्वपूर्ण योगदान स्पष्ट केले.

या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कसबा भागाचे संघचालक ॲडव्होकेट प्रशांत यादव यांनी भारतीय संविधानावर मार्गदर्शन केले व नागरिक कर्तव्ये व घटनात्मक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले.

मोतीबाग येथील केशव सभागृहामध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे अध्यक्ष राजीव जोशी यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे विश्वस्त राजेंद्र वालेकर यांनी केले,जगदीश सोमण यांनी वैयक्तिक पद्य सादर केले.भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन देखील यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमास ज्येष्ठ विधिज्ञ शरद चंद्रचूड, महेश आठवले, कैलास सोनटक्के, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ, रविंद्र किरकोळे, ज्येष्ठ प्रचारक श्रीधर पंत फडके,भाऊराव क्षीरसागर, शिरीष भेडसगांवकर,प्रांत प्रचारक यशोधन वाळिंबे, महानगर प्रचारक रोहित रिसबूड, प्रतिक परळीकर, डॉ मोरेश्वर गद्रे, अनिल देशपांडे, घोष प्रमुख वैभव गाडगीळ, तसेच भारतीय संस्कृती संवर्धक संस्थेचे विश्वस्त प्रसाद खेडकर, बाजीराव मणेरे, प्रकाश आठवले, किरण गांधी, उदय पंचपोर यांची मुख्य उपस्थिती होती.

कार्यक्रम राष्ट्रप्रेम, शिस्त आणि सांस्कृतिक गौरवाच्या वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला. कार्यक्रमास समाजातील प्रतिष्ठित नागरिक, सोसायट्यांचे पदाधिकारी, अमृततुल्य दुकानदार, डॉक्टर्स, उद्योजक, ज्येष्ठ नागरिक, महिला, महानगरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ''वूई ऑल आर विनर्स''






ज्योतिर्मय साहित्य

घर चैतन्यानं भारलेलं होतं. कृष्णाच्या उत्साहाने अवघं अवकाश उजळून निघालं होतं. त्याचा उत्साह जणू प्रत्येक भिंतीतून, प्रत्येक कणाकणातून ओसंडून वाहत होता. हसणं, उड्या मारणं आणि आनंद यांची एक अविरत लय घरभर निनादत होती. कारणच तसं घडलं होतं. एका शुक्रवारी संध्याकाळी कृष्णा शाळेतून घरी आल्यावर मला विचारत होता, 'आई, ट्रेकिंग म्हणजे काय असतं गं?' म्हटलं, 'कुठल्यातरी अवघड डोंगरावर, जिथं गाडी जात नाही अशा ठिकाणी पायी चालत जायचं, हातात काठी घेऊन, पायात शूज डोक्यावर टोपी घालून पाठीवर सॅक टाकून, खाऊचा डबा, पाण्याची बाटली घेऊन जायचं, त्यालाच ट्रेकिंग म्हणतात' आता उत्साहाचा धबधबा आणखी कोसळू लागला. 'आई, आमची शाळा आम्हाला ट्रेकिंगला घेऊन जाणारै मेरुलिंगच्या डोंगरावर आणि आम्हाला मग बक्षीसपण मिळणारै.' डोळे मोठाले करत नवलाईची गोष्ट कृष्णा मला सांगत होता. मीही मग डोळे मोठे करून, ओठांचा चंबू करून 'अग्गोबाई' अशी प्रतिक्रिया दिली.

झालं.. लगेचच रविवारी सकाळी लवकर निघायचं होतं धुमधडाक्यात तयारी सुरू झाली. डब्यात काय देणार? हा पहिला प्रश्न. अनेक पदार्थांची यादी समोर ठेवून झाली एक एक पदार्थ बाजूला सारत गाडी शेवटी थालीपीठ, उसळ अशा खास बेतावर आली. आत्ताच थालीपीठ करून ठेव, परत तू उठली नाहीस वेळेत तर मला उशीर होईल पोहोचायला वगैरे धमक्या देऊन झाल्या. त्या उत्साहावर, ऊर्जेवर नियंत्रण मिळवणं मला तरी कठीण गेलं. करत करत रविवार उजाडला. सगळं आधी वेळेच्या आधीच आटोपल्यामुळे मुलाच्या परिक्षेत आई पास झाली आणि आईवर अलोट प्रेम व्यक्त करुन गाडी इप्सितस्थळी पोहोचली. दिवसभर सगळे पालक शाळा व्यवस्थापनाशी संपर्क साधत होतो कारण सगळीच मुलं सहा ते बारा वर्षे वयोगटातील होती आणि त्यामानानं हा डोंगर कठीण होता.

थोडं रिलॅक्सेशन, थोडी हूरहूर, थोडी काळजी आणि खूप मोठ्या प्रतिक्षेनंतर उड्या मारत गेलेले सगळे हनुमान झोपूनच परत आले होते. पालकांचा जीव भांड्यात पडला. शिक्षकांकडून काय प्रतिक्रिया येतेय याकडे सगळ्या पालकांचे कान होते. शाळेचे मुख्याध्यापक स्वतः माझ्याजवळ आले साहजिकच मी विचारलं,' कृष्णा चढला का डोंगरावर न कूरकूर करता?

सर म्हणाले, हा अत्यंत गौण मुद्दा आहे, आज कृष्णानं खूप मोठी शिकवण आम्हाला दिलीय जी आमच्या कायम स्मरणात राहील. मी अवाक. सर पुढे म्हणाले,' एक अत्यंत अवघड चढण होती शेवटची. तिथपर्यंत सगळी मुलं उत्साहात होती. पण शेवटच्या या टप्प्यावर अनेक मुलांना मदत करावी लागली.' मला विचारायचं होतं की कृष्णाला मदत करावी लागली का? पण सरांनी आधीच माझ्या मनातला प्रश्न ओळखला आणि मला बोलायची संधी न देताच पुढं सांगू लागले, 'एक सहा वर्षांची मुलगी जी मुळातच शारीरिकदृष्ट्या थोडी कमजोर आहे ती या चढणीवर चढायला तयार होईना. ती खूप रडत होती. शिक्षकांची मदतही नाकारत होती आणि एकसारखी म्हणत होती की सर, मी लूजर आहे. सगळी मुलं वर चढली ती सगळी मुलं विनर्स आहेत मला बक्षीस मिळणार नाही कारण मी लूजर आहे. सर म्हणाले, मी तिला समजून सांगत होतो, तू लहान आहेस, आत्ता माझी मदत घे आत्ता हरलीस तरी पुढच्या वर्षी तू विनर असशील. ते ऐकून वर चढलेल्या कृष्णानं खाली उडी मारली आणि म्हणाला, सर वुई ऑल आर विनर्स.

सर म्हणाले, त्याचं ते वाक्य ऐकून मला कळलं की मी किती चुकीची समजूत काढत होतो त्या मुलीची. आधीच ती मनानं हरली होती आणि वर मी तिला तू लूजर आहे याची जाणीव करून देत होतो.

सर बराचवेळ काहीबाही बोलत होते, पण ते शब्द माझ्या कानावर नुसते आदळत होते, आत काही शिरत नव्हतं. मी कल्पनाशक्तीचा वापर करून ते दृश्य डोळ्यासमोर उभं करत होते. हरवून गेले होते की माझा मुलगा इतका संवेदनशील, इतका समजूतदार आहे? घरात नुसती दंगामस्ती करणारा, माकडउड्या मारणारा मुलगा इतकं जपू शकतो दुस–याचं मन?

त्या मुलीच्या आईलाही ही गोष्ट तोवर समजली होती. तीही माझे आणि कृष्णाचे आभार मानून निघून गेली होती, पण मी मात्र गोड धक्क्यातून अजून सावरलेच नव्हते.

यथावकाश माझं विचारचक्र सुरू झालं.

ज्याक्षणी ट्रेकिंग म्हणजे काय असं विचारत तो माझ्या जवळ आला होता त्यावेळची त्याची असीम ऊर्जा, नवीन गोष्टी शिकण्याकडचा कल या सगळ्याची जाणीव माझ्या मनात ठळकपणे झाली

कदाचित आम्हा पालकांकडून त्याक्षणी त्याची ऊर्जा दाबून टाकण्याची कृती घडली असती तर हा प्रसंग असा घडला नसता.

त्याचं कल्पनाविश्व, जिज्ञासू वृत्ती, नवनवीन अनुभव घेण्याची त्याची लालसा या सगळ्या गोष्टींमध्ये पालक म्हणून आम्ही सहभागी होतो.

त्यामुळे मी सुरक्षित आहे, मला माझे आईबाबा समजून घेतायत ही भावनिक सुरक्षितता त्याच्या मनात निर्माण झाली होती. कदाचित हीच भावना त्याच्या पुढच्या संवेदनशीलतेचा पाया असू शकते.


ट्रेकदरम्यान घडलेली घटना ही बालमनात 'विनर–लूजर' ही संकल्पना किती रुजलीये याचं दर्शन घडवते. सहा वर्षांच्या मुलीच्या तोंडून 'मी लूजर आहे' हे शब्द येणं, ही गोष्ट आजच्या स्पर्धात्मक व्यवस्थेची मानसिकता दाखवते. अपयश म्हणजे स्वतःची किंमत कमी होणं, अशी शिकवण नकळत तिच्या मनावर कोरली गेलेली आहे. शिक्षकही चांगल्या हेतूने बोलत असले, तरी ''आत्ता हरलीस'' हे शब्द तिच्या आत्मविश्वासावर आणखी घाव घालणारे ठरतात.

या पार्श्वभूमीवर कृष्णा किती विलक्षण वागला , याचं मला राहून राहून नवल वाटत राहिलं. त्याची भावनिक प्रगल्भता यातून ठळकपणे जाणवत होती. त्याच्या दृष्टीने जिंकणं म्हणजे फक्त शिखर गाठणं नव्हे, तर सोबतच्या मित्रमैत्रिणींना मानसिक आधार देणं आहे. हा दृष्टिकोन तो कुठे शिकला, याचं उत्तर अप्रत्यक्षपणे घरातल्या मुक्त, प्रेमळ वातावरणात दडलेलं असावं. सरांची प्रतिक्रिया ऐकून जो गोड धक्का मला बसला तोच प्रत्येक आईला बसला असता. आपलं मूल आपल्यापेक्षा अधिक संवेदनशील, अधिक समजूतदार असू शकतं हा विचारच सुखद धक्का आहे. आपल्या मुलांना आपण मूल्यं शिकवतो, असं आपल्याला वाटत असलं, तरी अनेकदा मुलंच आपल्याला माणूसपणाची खरी व्याख्या शिकवत असतात. एकूणच, ''We all are winners'' हे वाक्य केवळ एक ब्रीदवाक्य राहत नाही, तर आयुष्याकडे पाहण्याची एक व्यापक, माणुसकीची दृष्टी देऊन जातं.

***



# जात्यावरच्या ओव्या......




मानसा तुला वाच्या
मुक जित्राब सगळ
देवून शिव्याशाप
नका बोलू रे वंगळ ||४६८||

वाणीचा गोडवा
साधुसंतान वाटला
ठेवू मान ,बोलु छान
तुका हृदयी दाटला ||४६९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे...





ज्योतिर्मय साहित्य

पिंपळाच्या झाडाखाली असलेल्या मारुतीचे म्हणजे अश्वत्थ मारुतीचे दर्शन पुण्यप्रद मानले जाते. श्रावण महिन्यात तर दर शनिवारी पिंपळाची पूजा करतात. पिंपळ वृक्षाचे महत्व सांगणारा एक छान श्लोक आहे. तू आता मी तुम्हाला सांगते. तुम्ही लक्षात ठेवा आणि पाठ करा तो.

मूले ब्रह्मा, त्वचा विष्णू , शाखा शंकरमेवच
पत्रे पत्रे सर्वदेवायाम, वृक्ष रादन्यो नमोस्तुते.

म्हणजे ज्या वृक्षाच्या मुळांमध्ये ब्रह्मा, सालीमध्ये विष्णू, फांद्यांमध्ये भगवान शंकर आणि प्रत्येक पानात देवीदेवतांचा निवास असतो, अशा वृक्षराजाला ( पिंपळाला ) नमन असो.



अरे वा, आई किती माहिती आहे ग तुला! आज तर आम्हाला खूप नवीन गोष्टी कळल्या. पिंकी म्हणाली.

राजेश म्हणाला, आई या वडाच्या झाडाभोवती नुसत्या फेऱ्या मारल्या तरी किती छान वाटते. श्यामलाताई हसल्या आणि म्हणाल्या, तुम्हाला माहिती आहे का की वटपौर्णिमेच्या दिवशी आम्ही याच झाडाची पूजा करतो. त्याला प्रदक्षिणा घालतो. पिंकी म्हणाली, आई, ते माहितीये, पण का पूजा करतात आणि प्रदक्षिणा का करतात ते सांग ना... ?

श्यामलाताई म्हणाल्या, पिंकी तू सावित्री आणि सत्यवान यांची कथा ऐकली असशीलच. तरी मी सांगते. सावित्री ही पतिव्रता होती. यमाने सत्यवानाचे प्राण हरण केले होते. पण सावित्रीने आपल्या सामर्थ्याच्या आणि चातुर्याच्या बळावर यमाकडून त्याचे प्राण परत मागून घेतले. वटवृक्षाखालीच सत्यवानाचे प्राण पुन्हा परत आले. तेव्हापासून सवाष्ण स्त्रिया या वृक्षाची पूजा करतात. आपल्या पतीसाठी दीर्घायुष्याची प्रार्थना करतात. त्याला प्रदक्षिणाही करतात. वडाचे झाड भरपूर ऑक्सिजन देणारे आहे. त्यामुळे त्याच्याभोवती प्रदक्षिणा केल्याने आपोआपच शुद्ध प्राणवायूचा आपल्या फुफ्फुसांना होऊन आपले आरोग्य सुधारण्यास मदत होते. शिवाय वडाची मुळे, साल, पाने औषधी असतात. सांधेदुखीवर त्यांचा चांगला उपयोग होतो.

तसेच केस वाढण्यासाठी वडाच्या झाडाचा उपयोग करून तेल बनवतात.

कडुलिंबाचे झाड सुद्धा असेच औषधी असते. त्याची सावली तर खूप थंड असते. गुढीपाडव्याच्या दिवशी आपण कडुलिंबाच्या कोवळ्या पानांपासून चटणी बनवतो. ती आरोग्यासाठी अतिशय चांगली असते, आपली प्रतिकारशक्ती वाढवणारी असते.

अबब ! किती उपयोगी असतात ही झाडे, नाही का ? पिंकी म्हणाली.

हो तर. म्हणून बाळांनो, आपल्याला नैसर्गिक आपत्तीपासून आणि ग्लोबल वार्मिंगपासून वाचायचे असेल, आपली वसुंधरा हिरवीगार ठेवायची असेल तर विदेशी झाडांचा मोह सोडून देऊन प्रत्येक १०० मीटर अंतरावर प्रत्येकी एक औदुंबर, वड, पिंपळ, कडुलिंब यासारखी झाडे लावली पाहिजेत. तसेच प्रत्येक घरासमोर, परसबागेत किंवा आपल्या गच्चीवर तुळस अवश्य लावावी. तुळस अत्यंत औषधी तर आहेच पण पण ती भरपूर ऑक्सिजनचा पुरवठा करणारी वनस्पती आहे.

आई, आता कळले की तुकाराम महाराज, वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे असं का म्हणत असावेत.

एवढ्यात श्यामराव परत आले. अरे, मायलेकांच्या गप्पा अजून संपल्या नाहीत का ? चला, आपल्याला अजून बरेच काही पाहायचे आहे. सगळे परत गाडीत बसले. गाडी जंगलाकडे मार्गस्थ झाली.



ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# द्वैतकल्पनानिरसन

ज्योतिर्मय साहित्य

शुद्ध कल्पनेच्या बळावर अशुध्द कल्पना नाहिशी करता येते.

मित्रांनो समर्थांचा मोलाचा सल्ला याठिकाणी सदैव लक्षात ठेवावा.''कधीही खोटं वागु नये. नेहणी सत्याने वागावं आचरण शुध्द ठेवाव.


शुध्द कल्पनेच्या अंगी स्थिरता असते म्हणजेच मन विचलित होत नाही. ती निर्गुण रूपात स्थिर रहाते. स्वस्वरूपाचे विस्मरण ती कधीही होऊ देत नाही. स्वस्वरूपाचे अखंड अतूट,अनुसंधान किंवा स्मरण हीच शुध्द कल्पनेची खुण समजावी. सतत स्वस्वरूपी लीन,द्वैत मय द्रुष्यांचे संपूर्ण विस्मरण आणि अद्वितीय ब्रम्हाचे साक्षात ज्ञान या तीन गोष्टी जेथे असतात तिथे शुध्दकल्पना कायमची वास करते.

अद्वैतात रमणारी कल्पना शुध्द तर द्वैतात रमणारी कल्पना अशुद्ध असते. अद्वैतकल्पनेचा उदय झाला की द्वैत नाहीसे होते. शुध्द कल्पना अशुद्ध कल्पनेवर मात करते. ते स्वस्वरूप होय.स्वस्वरूपाशी कल्पना करू लागले की आपण तद्रुप होतो. त्यातचं आपण रममाण होऊ लागतो.ज्या प्रमाणे सुर्य अस्ताला जाऊ लागला म्हणजे अंधार पडू लागतो त्या प्रमाणे आत्मज्ञान मलीन झाले की अज्ञानाचा जोर वाढतो हे टाळण्यासाठी अखंड चांगले तेच श्रवण करावे.

श्रीराम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ
समास ५ वा समाप्त

(क्रमशः)

# सत्संगतीचे दोन प्रकार



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. संतांची संगत दोन प्रकारे होऊ शकते. एक, संतांच्या देहाची; दुसरी, संतांनी सांगितलेले साधन करीत राहण्याची. यांपैकी पहिली, म्हणजे संताच्या देहाची संगती लाभणे फार कठीण आणि दुर्मिळ. कारण संत जरी खरा असला तरी त्याला ओळखणे कठीण असते, आणि पुष्कळदा त्याच्या बाह्य वागणुकीवरून मनात विकल्प येण्याचा संभव असतो; आणि एखाद्या भोंदूशीच गाठ पडली तर त्याच्या संगतीपासून नुकसान हे ठरलेलेच. म्हणून पहिला, म्हणजे संताच्या देहाच्या संगतीचा मार्ग, हा पुष्कळदा धोक्याचा ठरण्याचा संभव असतो. दुसऱ्या मार्गाने जाण्यात, म्हणजे त्याने सांगितलेले साधन करण्यात, बिलकूल धोका नसतो; कारण खरा संत काय किंवा भोंदू साधू काय, कोणीही झाला तरी तो दुसऱ्याला सांगताना खरे आणि बरोबर असेल तेच सांगेल. तो भोंदू असला तरी, आपला भोंदूपणा लपविण्याकरिता, जे बरोबर असेल तेच सांगणे त्याला जरूर असते. साधकाने शुद्ध भावनेने ते साधन केले की सत्संगतीचा फायदा मिळून त्याचे काम होते. खऱ्या संताच्या देहाच्या संगतीचा लाभ जर दैववशात् प्राप्त झाला तर मात्र काम बेमालूम होते. ज्या वाहनाचा आपण आश्रय करतो त्या वाहनाचा वेग हा आपला वेग होतो; फक्त त्या वाहनात निश्चल बसून राहणे एवढेच आपले काम असते. तसे आपण खऱ्या संताजवळ नुसते पडून राहावे. संताच्या संगतीत आपली कृती अशी काहीच नसते, नुसते अस्तित्व असते. त्यामुळे अहंकाराला वाव न राहून वासनेचा क्षय व्हायला फार मदत होते. तुकाराम महाराजांनी देवाजवळ धनसंपदा मागितली नाही, मुक्तीदेखील नको असे म्हटले, फक्त संतसंगती दे असे म्हटले.

संतसंगाने नाम घेण्याची बुद्धी येते. बुद्धीची स्थिरता ठेवणे हे फक्त नामानेच साधेल. नाम जरूर तेवढे ठेवते आणि बाकीचे नष्ट करून टाकते. पण अनन्यभावाने नाम घ्यावे. नाम घेता घेता बुद्धीला स्थिरता येते; आणि मग मनात विकल्प न येता संतांच्या देहाच्या संगतीचा खरा फायदा घेता येतो. सत्संगतीत कष्टाशिवाय ईश्वरप्राप्ती होते. संतसंगतीत साधने आपोआप होत असतात. त्यांच्या पूजनाबरोबर पूजन, भजनाबरोबर भजन, श्रवणाबरोबर श्रवण, स्मरणाबरोबर स्मरण आपोआप होते. सत्संगतीत स्वत:ची विस्मृती होते आणि नामस्मरण घडते. म्हणून प्रयत्नाने संतसंगती करावी. तिथे प्रारब्ध आणू नये. सत्संगतीत राहून नाम घेतले तर देहबुद्धीच्या कोंडीतून बाहेर पडता येते.

संतांना जे आवडते ते आपल्याला आवडणे म्हणजे त्यांचा समागम करणे होय.

***



श्री संत ज्ञानेश्वर
अभंग व अर्थ

## अभंग २८ (पुढे)

कटावरी ठेवूनि हात ।
जनां दावी संकेत ।
भवजलाब्धीचा अंत ।
इतुलाची ॥
सम चरणींच्या खुणा ।
उभा पंढरीचा राणा ।
तो आवडे जनांमना ।
दुर्लभ गे माये ॥५॥
कैवल्याचा गाभा ।
कीं ब्रह्मविद्येचा वालभा ।
निकटपणाचिया लोभा।
कैसा उभा असे ॥
देवा पायींची वीट।
तेचि माये नीट ।
वरि येऊनि भीमातटी।
वोळग दावी गे माये ॥ ६॥
नेति नेतिचेनि बिरारें ।
उभऊनि श्रीकरारें ।
श्रृंगाराचेनि पडिभरें ।
चराचरें वोळगती ॥
हा मेखळेचा मध्यमणी।
उदो केला ग्रहगणीं ।
मध्य नायकु तरणी किरणीं ।
विरजितु गे माये ॥७॥
आमुची हृदयींची श्रीमूर्ति।
घेऊनि विठ्ठलवेषाची बुंथी ।
आतां चाळविसी किती ।
बापा पालटु नेघे ॥
बाप रखुमादेविवरा विठ्ठला ।
त्वां मजशीं अबोला कां धरिला ।
जीवीं जीव आहे उरला ।
तो निघों पाहे ॥८॥

अर्थ पुढील भागात
क्रमश :



आरोग्य संजीवनी

# वजन किती हवे ?

ज्योतिर्मय साहित्य

आपल्याला वाटते, वाढत्या वयानुसार आपले वजन योग्य आहे, पण खरे तर विसाव्या वर्षीचे वजन हेच आपले योग्य वजन!

लहानपणापासून शरीराचा विकास व वाढ होत असतांना उंची व वजन वाढणे हा नैसर्गिक नियम आहे, पण एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे ज्यावेळेस वजन वाढते त्यावेळेस ते नुकसानकारक ठरत असते. यावरून जाडी किंवा लठ्ठपणा ठरत असतो. पण आपण जाड आहोत का नाही हे कसे ओळखावे? व्यक्ती तितक्या प्रकृती प्रमाणेच प्रत्येकाची अंगकाठी व वजन वेगवेगळे असते. त्यामुळे लठ्ठपणा ठरवतांना केवळ वजनाचा निकष लक्षात न घेता आणखीन काही गोष्टींचा विचार करणे आवश्यक असते. यासाठी 'बीएमआय' हा साधारण लोकांना सहजपणे मोजता येईल असा फॉर्मुला उपयोगात आला.

बीएमआय = वजन / उंचीचा वर्ग
उदाहरणार्थ.. ५ फूट ७ इंच (१.७ मीटर) उंचीच्या व ७५ किलो वजनाच्या माणसाचा बीएमआय= ७५/ (१.७)२ = २५.९

आशिया खंडातील विशेषत: भारतीयांमध्ये बीएमआय २१ हा योग्य मानला जातो. परंतु तो अधिक असल्यास त्या व्यक्तीला स्थूल असे म्हंटले जाते. हाच मानक युरोपीय लोकांसाठी ३० असा आहे. याचे कारण भारतीय लोकांमध्ये चरबी मुख्यत: पोटाच्या आसपास अधिक प्रमाणात साठते. पोटाच्या आसपासची चरबी ही जास्त धोकादायक असते कारण ही चरबी शांत न बसता रक्तामध्ये काही टॉक्सिक हार्मोन्स सोडते ज्याला ॲडीपो- सायटोकाईन्स असे म्हणतात. हे ॲडीपो- सायटोकाईन्स स्थूलतेमुळे होणाऱ्या मानसिक व शारीरिक आजारांना आमंत्रण देतात. याउलट युरोपीय वंशातील लोकांमध्ये खांदा व मानेच्या अवतीभवती विसावलेली चरबी ही शांत व निष्क्रिय असल्यामुळे एकूणच कमी धोकादायक असते.

बीएमआयच्या व्यतिरिक्त पोटाचा घेरसुद्धा लठ्ठपणाचा एक चांगला मापदंड म्हंटला जातो. स्त्रियांमध्ये हा ३१ इंच (८० सेमी) वा त्यापेक्षा अधिक तर पुरुषांमध्ये ३५ इंच (९० सेमी) च्या वर असल्यास स्थूलतेत मोडतो. वजनाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम दोन प्रकारात मोडतात- एक चयापचयाशी संबंधित आजार जसे डायबेटीस, कोलेस्टेरॉल, उच्च- रक्तदाब इ. व दुसया प्रकारातील आजार स्थूलतेमुळे हाडं व स्नायूंचे आजार- पाठदुखीपासून गुडघे दुखीपर्यंत. या दोन्ही धोक्यांमध्ये तुलना केल्यास चयापचयाशी संबंधित आजार हे थोडेही वजन वाढले तरी आपले डोके वर काढतात, तर हाडांच्या व स्नायूंचे आजार वजनातील लक्षणीय वाढीनंतरच होतात. आपल्या शरीराचे वजन वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे येऊ शकते. त्यामध्ये अक्षरश: किलो-दीड किलोचाही फरक पडू शकतो. त्यामुळे शक्यतो वजन मॉनिटर करतांना एकाच वेळी ऐकाच काट्यावर वजन करावे.

१८ ते २० वयानंतर आपली उंची स्थिरावते व हाडांची वाढ थांबते. त्यामुळे या वयात जे वजन असते (जर ते 'अति' प्रमाणात नसेल तर) ते आपल्या शरिराला सहजपणे पेलवते. सामान्यत: एक समज आहे कि वयाबरोबर वाढणारे वजन हे शरीराला सहजपणे पेलवता येते, पण या वाढणाया वजनालाही ५ किलोपर्यंतची मर्यादा असते. म्हणजेच तुमच्या अठरा ते विसाव्या वर्षाच्या वजनापेक्षा जर तुमचे वजन ५ किलोपेक्षा अधिक असेल आणि जरी ते उंचीला प्रमाणशीर असेल तरीही ही लठ्ठपणाची सुरवात ठरू शकते. उदाहरणादाखल एखाद्या अतिशय काटक स्त्रीचे अठरा ते विसाव्या वर्षीचे वजन ४५ किलो आहे व दहा वर्षानंतर ते ६० झाले, तर ती लठ्ठपणातच मोडते. तिच्या उंचीनुसार योग्य वाटणारे हे वजन तिच्याकरता धोकादायक असू शकते. त्यामुळे बारीक माणसाने आयुष्यभर बारीकच राहावे व जाड माणसाने आयुष्यभर बारीक होण्याचा प्रयत्न करावा.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

***



लघु बोधकथा

♦ धनाचा विनियोग ♦

एकदा एक कोल्हा जमिनीत बीळ खणत असताना खूपच खोल खणत गेला. खूप खोल गेल्यावर त्याला तिथे एक धनाचा हंडा दिसला व त्यावर एक वृद्ध नाग त्या धनाचे रक्षण करत होता. कोल्ह्याने नागाला विचारले,"हे नागदेवता, तुम्ही इथे काय करता आहात." नाग म्हणाला," माझ्या पूर्वजांनी पुरून ठेवलेल्या धनाचे मी रक्षण करत आहे." मग कोल्हा पुन्हा म्हणाला," पण इथं इतकं मोठं धन असताना तुम्ही कधी त्याचा उपभोग घेतला आहे किंवा नाही. उपभोग सोडा थोडंफार धन दानापोटी तरी खर्च केलंत काय" नाग म्हणाला," कसं शक्य आहे, हे धन कमी होऊ नये म्हणून तर मी स्वत: या धनाचे रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून रक्षण करत आहे. त्याचा उपभोग घेणे किंवा दुस-याला दान देणे ह्यापेक्षा या धनाचे रक्षण करण्यातच मला जास्त आनंद आहे." हे ऐकून कोल्हा नागाला म्हणाला," मग नागदेवा, तुमच्या असल्या या श्रीमंतीपेक्षा मी गरीब आहे तोच बरा. ज्या धनाचा उपभोग घेतला जात नाही व ज्यातून दान केले जात नाही अशा धनाचा काय उपयोग"

तात्पर्य - ज्या धनाचा योग्य विनियोग न होता केवळ संचय केला जातो त्या धनाचा मनुष्यमात्राला काहीच फायदा नाही.

# आयएमए छ.संभाजीनगर हे राज्यासाठी डॉक्टरांच्या एकतेचे आदर्श मॉडेल आहे-डॉ. संतोष कुलकर्णी

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभ अत्यंत शिस्तबद्ध आणि गौरवपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संतोष कुलकर्णी, राज्य अध्यक्ष, यांनी उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अर्चना भांडेकर आणि डॉ सोनाली सावजी यांनी केले.

कार्यक्रमात बोलताना डॉ. संतोष कुलकर्णी यांनी मागील नऊ महिन्यांतील छत्रपती संभाजीनगर शाखेच्या कार्याचे विशेष कौतुक केले. संघटनात्मक शिस्त, सातत्यपूर्ण उपक्रम, समाजाभिमुख आरोग्य कार्यक्रम, डॉक्टरांच्या हक्कांसाठी ठाम भूमिका आणि संघटनेतील एकतेचे उदाहरण राज्यपातळीवर आदर्श ठरत असल्याचे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

या वेळी डॉ. अनुपम टाकळकर यांनी सांगितले की, संघटना ही केवळ पदांची रचना नसते. ती मूल्यांची, जबाबदारीची आणि समाजाभिमुख सेवेची चळवळ असते. मागील काळात ने डॉक्टरांसाठी ठोस भूमिका घेतली. समाजासाठी प्रभावी आरोग्य उपक्रम राबवले. ला एक सशक्त व्यासपीठ बनवणे हेच आमचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.



डॉ. योगेश लक्कास यांनी सांगितले की, शाखेने तरुण डॉक्टरांना संघटनेशी जोडले. नेतृत्व घडवण्याची प्रक्रिया सुरू केली. पारदर्शकता, संवाद आणि सहभाग वाढवल्यामुळे संघटना अधिक मजबूत झाली आहे.

डॉ शिवाजी पोले, कोषाध्यक्ष यांनी सांगितले की, संघटनात्मक शिस्त, नियोजनबद्ध कामकाज आणि एकत्रित नेतृत्वामुळे मोठे उपक्रम यशस्वी होत आहेत. ही शाखा डॉक्टर, विद्यार्थी आणि समाज यांना एकत्र जोडणारे प्रभावी व्यासपीठ बनत आहे. याचे श्रेय समाजासाठी अविरत झटणारे अध्यक्ष डॉ अनुपम टाकळकर यांना जाते

या प्रसंगी डॉ. संतोष रांजळकर, डॉ. उज्वला दहिफळे, डॉ. दत्त कदम , डॉ. केदार साने, डॉ. देवदत्त पळणीटकर , डॉ. विकास देशमुख, डॉ. अंजली गाडे, डॉ. आसावरी टाकळकर, डॉ. सोनाली सावजी , डॉ. प्रतिमा भाले, डॉ. संभाजी चिंतले, डॉ प्रफुल्ल जटाळे, डॉ. प्रशांत दरक, डॉ. गितेश दळवी , आदि मान्यवर उपस्थिती होते.

या कार्यक्रमात देशभक्तीपर सांस्कृतिक संगीतमय कार्यक्रमही सादर करण्यात आला. डॉ. श्रद्धा परितकर, डॉ. अपर्णा देशमुख, डॉ. सतीश रोपळेकर, डॉ. कांचन रोपळेकर, डॉ. अबोली देशपांडे आणि इतर कलाकारांनी सादर केलेल्या गीतांनी संपूर्ण वातावरणात राष्ट्रभक्तीची ऊर्जा निर्माण केली.

या प्रसंगी च्या समाजाभिमुख उपक्रमांमध्ये सक्रिय योगदान देणाऱ्या सदस्यांचा विशेष गौरव करण्यात आला. आओ गाव चले, कनेक्ट, साथी या सार्वजनिक आरोग्य आणि समाजसेवा कार्यक्रमांमध्ये स्वयंसेवक म्हणून सेवा देणाऱ्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील आरोग्यसेवा, जनजागृती, गरजू रुग्णांपर्यंत पोहोच, सामाजिक जबाबदारी आणि संघटनात्मक सेवेचे हे कार्य अनुकरणीय असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

हा कार्यक्रम केवळ ध्वजारोहण समारंभ न राहता संघटनात्मक एकता, राष्ट्रीय मूल्ये, सामाजिक बांधिलकी आणि वैद्यकीय सेवेची दिशा स्पष्ट करणारा ठरला. छत्रपती संभाजीनगर शाखेने पुन्हा एकदा शिस्तबद्ध आयोजन, प्रभावी नेतृत्व आणि सामूहिक सहभागाचा आदर्श निर्माण केला.

''डॉ. संतोष कुलकर्णी यांनी राज्याध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताच त्वरित कार्याला सुरुवात केली. संघटनेच्या कार्यपद्धतीत त्यांनी शिस्त, रचना आणि कार्यक्षमतेवर आधारित मूलभूत बदल घडवून आणले. डॉक्टरांचे प्रश्न, संघटनात्मक बळकटी आणि समाजसेवा यांचा समतोल साधत त्यांनी ला स्पष्ट दिशा आणि मजबूत कार्यसंस्कृती दिली आहे.'' असे उद्गार डॉ. अनुपम टाकळकर यांनी याप्रसंगी काढले

# अनोखी क्षेत्रभेट जिल्हा परिषद दस्तगीर वाडी

**ज्योतिर्मय साहित्य**

दस्तगीर वाडी येथील जिल्हा परिषद शाळा येथे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती जयश्री औताडे मॅडम यांच्यासोबत त्यांच्या शाळेवर गेल्यानंतर आलेल्या अनुभवाचे चित्र रेखाटन ही पण एक आगळीवेगळी अनोखी मेजवानीच होय.



बालकांच्या चिमुकल्या हातांनी पताका लावल्या. गावातील सुजाण सुसंस्कृत मंडळीने केलेले सहकार्य मला फार आवडले.नागरिकांच्या मनातील,कृतीतील इतकी सकारात्मकता, सहकार्य तेही जिल्हा परिषद शाळेत ही बाब अतिशय कौतुकास्पद, अभिमानास्पद आहे.

शाळेत अनेक सुविधा नागरिकांनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. मा. प्रभाकर साळे ग्राम पंचायत सदस्य यांनी जिल्हा परिषद शाळेला साऊंड सिस्टीम दिली आहे. सौ. सुनिता घाडगे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार स्कूल बॅग भेट दिलेल्या आहेत. अंगणवाडी शिक्षिका आशा गंगाधर माने यांनी थोर महापुरुषांच्या प्रतिमा शाळेला सप्रेम भेट दिलेल्या आहेत.

नागरिकात इतके औदार्य हे शिक्षकांच्या सेवेप्रती समर्पण वृत्तीने आदरणीय मुख्याध्यापिका श्रीमती जयश्री औताडे मॅडम यांनी स्वतःच्या कर्तृत्वाने सिद्ध केले आहे.

सहकार्य करण्यासाठी हजर असलेल्या सदस्यांची नावे अनुक्रमे धिरज घाडगे, प्रवीण घाडगे, गणेश घाडगे, शंकर माने, विनोद घाडगे, विनीत माने, प्रवीण माने, दिपक चोपणे, कमलाकर जोगदंड व सर्व विद्यार्थी व मुख्याध्यापिका श्रीमती जयश्री औताडे मॅडम, जयश्री मुंडे हे उपस्थित होते.



**सौ जयश्री अर्जुन मुंडे**
**अंबेजोगाई**

औताडे मॅडम यांना झाडे लावण्याचा, झाडांचे संगोपन करण्याचा आणि झाडे देण्याचा एक उल्लेखनीय अनुकरणीय विशेष छंद तर आहेच आणि त्यांच्या छंदाची रुजवण त्या विद्यार्थ्यांच्या बालमनात रुजवत आहेत.

त्यांनी पुस्तकांच्या कपाटावर केलेली केलेली वारली पेंटिंग ही सुरेख आणि सुंदर आहे. हस्ताक्षर, रांगोळी, वकृत्व अशा अष्टपैलू अष्टावधानी व्यक्तिमत्व असणाऱ्या जयश्री मॅडम बालमनावर अनेक कलागुणांची रुजवण करत आहेत.


सतत देणाऱ्या हाताना कधीच सहकार्याची उणीव भासत नाही. देणाऱ्या ओंजळी कधीही रिकाम्या होत नाहीत. त्यांच्या सतत सातत्यपूर्ण कार्य पाहता सतत प्रेरणा मिळते. त्यांना पाहून मला बा.भ. बोरकर यांची कविता आवर्जून आठवते.

देखणे ते हात ज्यांना
निर्मितीचे डोहळे
मंगलाने गंधलेले
सुंदराचे सोहळे
देखणी ती पाऊले
जी ध्यासपंथे चालती
वाळवंटातून सुद्धा
स्वस्तीपद्म
रेखिती.......

सतत क्रियाशील हाताना सहकार्याचे वरदान हे आपसूक मिळते याचा प्रत्यय मला त्यांच्या सानिध्यात आला. जिथे नवीन शिकायला मिळते तिथे बालमन रमते,वळते, आवर्जून जाते . सर्वांच्या आवडत्या जयश्री मॅडम यांना पुढील प्रेरणादायी वाटचालीसाठी अनंत शुभेच्छा..

# समीक्षक चंद्रकांत पाटील यांना पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय साहित्य**



छत्रपती संभाजीनगर : कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दिला जाणारा 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' मराठीतील ख्यातनाम अनुवादक, कवी व समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांना जाहीर झाला आहे. रोख ५१ हजार रुपये आणि सन्माचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकांत पाटील यांनी सर्जनशील लेखनाबरोबरच अनुवाद व समीक्षा प्रकारात महत्त्वपूर्ण लेखन केले आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात अध्यापन करीत असताना पाटील यांनी मराठी कविता भारतीय स्तरावर नेण्यामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. 'आणि म्हणूनच', 'आणि तोपर्यंत' व 'कवितेसमक्ष' हे त्यांचे महत्त्वाचे समीक्षा ग्रंथ आहेत. त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्याची दखल घेत शिवाजी विद्यापीठाने पाटील यांना 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' जाहीर केला आहे. येत्या २४ फेब्रुवारी रोजी कोल्हापूर येथे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि राजन गवस यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. १९६० नंतरच्या आधुनिक मराठी साहित्याचा पुरस्कार करण्यामध्ये पाटील यांचा महत्त्वाचा वाटा आहे. लघुनियतकालिकांच्या चळवळीच्या माध्यमातूनही त्यांनी मोठे लेखन केले आहे. पुरस्कार निवड समितीत प्रा. एकनाथ पगार (देवळा), प्राचार्य गोविंद काजरेकर (बांदा) व प्रा. नंदकुमार मोरे (कोल्हापूर) यांनी काम पाहिले.

# नातं (भाग ८)

**ज्योतिर्मय साहित्य**

आणि मग आनंद अर्चनाला म्हणाले,खरं तर असे विवाह होणे म्हणजे दुःखातून सावरुन एकाच आयुष्यातील दुसरी इनिंग म्हणता येईल. तुमचे काय मत आहे अर्चना?

अर्चना म्हणाली, तुम्ही पुरुष मंडळी अश्या नाजूक विषयावर जरी लगेच व्यक्त होऊ शकता तरी महिलांना अश्या विषयावर व्यक्त होण्यास वेळ लागतो, या विषयी मी सध्याच काही बोलणार नाही.

हे वाक्य ऐकून आनंद यांनी स्मित केले, तेंव्हा अर्चना म्हणाली, आनंद सर हलकेच हसायला काय झाले?

तेंव्हा आनंद म्हणाले, पुन्हा सर? मी मागेच म्हणालो होतो मला सर म्हणू नका.

नुसते आनंद म्हटलं तर मला आनंद वाटेल.

तेंव्हा अर्चना म्हणाली, तुम्ही विषयाला बगल देता आहात. मी तुम्हाला विचारले तुम्ही हळूच का हसलात?

तेंव्हा आनंद म्हणाले, आपण बोलत होतो त्या नाजूक विषयावर, तेंव्हा

तुम्ही म्हणालात, मी सध्याच काही बोलणार नाही याचा अर्थ सध्या नाही पण

काही काळ उलटल्यावर, तुम्ही या विषयावर मुक्तपणे व्यक्त होणार हे नक्की, त्या वेळेची मी वाट पाहीन.

हे ऐकून अर्चना थक्क झाली. ती आनंद यांना म्हणाली, सर आज तुम्हाला डिस्चार्ज देणार आहेत,



आता चार वाजता चहा आणि बिस्कीट खायचे आहे.

पहिले आरोग्य महत्वाचे आहे, सर सलामत तो पगडी पचास.

बस आता तुम्ही काढलेल्या विषयाला पूर्ण विराम दया.

इतक्यात तेथे डॉ चेकिंगला आले.

त्यांनी आनंद यांना चेक केले, हृदयाचे ठोके, बी पी. अगदी नॉर्मल होते, हृदयाचे ठोके ही एकदम नॉर्मल होते, आनंद यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती.

डॉक्टर, अर्चना यांच्याकडे बघून म्हणाले,तुमच्या रुग्णाला आज संध्याकाळी ६ वाजता डिस्चार्ज मिळेल.

तुम्ही कागदपत्रे व डिस्चार्ज पेपर बनवून घ्या, तोपर्यंत येथे राजू येऊन थांबेल.



*गिरीश खं. वसेकर, पुणे*

आणि मग अर्चना बिलिंग काऊंटरकडे गेली. आनंद यांच्या कंपनीचे हॉस्पिटलशी असलेले अग्रिमेंट व इन्शुरन्स यामुळे फार काही पैसे लागले नाहीत.उलट पहिले अँडव्हान्स भरलेले नॉमिनल दहा हजार ही परत मिळाले., ते ही ज्या गुगल पे वरून भरल्या.गेले होते,त्याच गुगल पे नंबर वर पैसे परत आले.अर्थात ते अर्चनाच्या गुगल पे वर परत आले.

बिलिंग काउंटरकडून क्लिअरन्स घेऊन पुढे डिस्चार्ज लेटर घेऊन ती आनंद यांच्याकडे परत आली.

आता डिस्चार्ज मिळणार की, तेथे भावजी, भावजी करत मकरंद आला.

तुम्हाला काय झाले ? तुम्ही मला का कळवले नाही? मी कुणीच नाही का तुमचा? असे अनेक प्रश्न करू लागला

तेंव्हा अर्चना म्हणाली, मकरंद एकावर एक किती प्रश्न विचारता आहात?

मकरंद, आनंद यांना श्वास तर घेऊ दया, आता तर थोडे बरे झाले आहेत.

अर्चनाचे वाक्य खोडून मकरंद मध्येच तावातावाने म्हणाला,तुमच्या सारख्या परक्या व्यक्तीला सगळं माहित आहे आणि मी ,आनंद यांचा सख्खा मेहुणा, तरीही मला माहित नाहीं.

खरं तर तुमचे आणि आनंदचे नातं काय ? हा प्रश्न मला भेडसावत आहे.


हे सारं ऐकून आनंद आणि अर्चना मकरंदकडे पाहतच राहिले आणि आनंद काही बोलणार, इतक्यात अर्चनाचा हुंदका दोघांच्या कानावर पडला...


**(क्रमशः)**









# वर्षपूर्तीच्या निमित्ताने.....

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

व्यापारी आडनाव असणारे पण प्रत्यक्षात व्यापार न करता प्रेमभाव जपणारे निस्वार्थ व्यक्तिमत्व म्हणजे श्री संजय व्यापारी. काही लोक विलक्षण वेगळेपण जपतात. त्यांचे वेगळेपण त्यांच्या वागण्यात, बोलण्यात आणि व्यवहारात दिसून येते. त्यांच्या प्रेमळ व निस्वार्थी वृत्तीचे दर्शन घडते.

असेच एक व्यक्ती मला सहा महिन्यापूर्वी व्हॉट्सअप वर भेटले आणि आज मी हक्काने त्यांना माझे जवळचे मित्र म्हणून संबोधू शकतो. ही व्यक्ती दुसरी तिसरी कुणी नसून संभाजी नगर येथील, ज्योतिर्मय या ई दैनिकाचे संपादक श्री संजय व्यापारी सर होत.

२६ जानेवारी २०२५ रोजी, व्यापारी सरांनी नव साहित्यिकांना प्रेरणा मिळावी व छोट्या मोठ्या साहित्य विषयक बातम्या प्रकाशित करण्यासाठी ज्योतिर्मय हे ई-दैनिक सुरु केले.

कुठल्याही मोठ्या जाहिरातीचे पाठबळ नसताना असे वर्तमानपत्र चालविणे म्हणजे अतिशय कठीण असे काम. असे काही करणे म्हणजे, पैसा तर लागतोच. मग जवळचे थोडेसे पैसे टाकून त्यांनी ज्योतिर्मय हे दैनिक सुरू केले.

ज्योतिर्मय म्हणजे प्रकाशमय, तेजस्वी, प्रकाशमान असे होय.

नवसाहित्यिकांचे लेख, कविता ज्योतिर्मय दैनिकात प्रकाशित करून त्यांना प्रकाशझोतात आणण्याच्या त्यांचा हा प्रयत्न होता व त्यांच्या या प्रयत्नाने आता चांगला वेग धरला आहे.


ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
वर्षपूर्ती
"ज्योतिर्मय" सत्य आणि निर्भिड पत्रकारितेचे १ वर्ष पूर्ण !

अनेक लेखक आपले छान छान विचार आपल्या लेखणी द्वारे ज्योतिर्मय मार्फत वाचकात, समाजात पोहचवत आहेत. त्यामुळे समाजात संस्कृती व सद्विचारांचा प्रसार व प्रचार होतो आहे, आणि यामुळेही सर्व साहित्यिकांना समाजात एक प्रकारचे वेगळे स्थान व प्रतिष्ठा प्राप्त होते आहे. याचा आनंद त्या व्यक्तीला तर होतो आहेच पण व श्री व्यापारी सरांना याचे समाधान लाभते आहे.

विशेष म्हणजे ऑक्टोबर २०२५मध्ये माझा, पापा (पालक व पाल्यांसाठी) हा पहिलाच किशोर लेख संग्रह व टांग टिंग टिंगा हा पहिलाच बालकाव्य संग्रह, तसेच माझी पत्नी सौ. रचनाचा निसर्गगंध ही पहिलाच काव्य संग्रह प्रकाशित झाला.

श्री व्यापारी सरांचे ही हे प्रथम पुस्तक प्रकाशन होते जे पुण्यात प्रकाशित झाले.

अतिशय व्यवस्थित व सूत्रबद्ध पद्धतीने, अल्प दरात श्री व्यापारी सरांनी आमची पुस्तके प्रकाशित केली, याचा मला व माझ्या पत्नीला आनंद आहे.


*गिरीश वसेकर ( देशपांडे)*
*नांदेड सिटी, पुणे ९४२२६५९४००*

श्री व्यापारी सर नुसतेच प्रकाशक नसून एक अध्यात्मिक व्यक्ती आहेत याचीही प्रचिती सर्व साहित्यिकांना आली, याचे कारण म्हणजे मागील दत्तजयंती निमित त्यांनी राक्षसभूवन येथे दहा दिवसापेक्षा जास्त मुक्काम करून श्री दत्त गुरूंची सेवा दरवर्षी प्रमाणे अतिशय कडक नियम पाळून,दहा व उपवास करून केली. याच दरम्यान त्यांनी तेथून श्री दत्त स्मरणिका प्रकाशित केली.त्यात अनेक साहित्यिकांचे सुंदर सुंदर अध्यात्मिक अनुभव समाविष्ट केले व अतिशय देखण्या व वाचनीय अंकाचे प्रकाशन तेथेच केले.

मात्र या दरम्यान ही त्यांनी आपल्या दैनिकाच्या प्रकाशनावर परिणाम होऊ दिला नाही. असे हे आपल्या कार्यात कायम व्यस्त असणारे व्यापारी सर होत. आज बघता बघता व्यापारी सरांचे ज्योतिर्मय हे ई दैनिक एक वर्षाचे झाले आहे, अर्थात वर्षपूर्ती झाली आहे. त्यांनी छोटेसे लावलेले हे रोपटे आज हळूहळू वटवृक्ष होऊ पाहते आहे, भविष्यात ते नक्कीच गगनाला भिडणार आहे, याची खात्री मला आहे.

श्री संजय व्यापारी सरांनी लावलेला हा साहित्यदीप असाच आणखी तेजोमय होवो आणि तो अखंड तेवत राहो यासाठी श्री संजय व्यापारी सरांना, ज्योतिर्मयला खूप खूप शुभेच्छा.

# मोफत नेत्र तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - लायन्स क्लब छत्रपती संभाजीनगर वाळूज, क्रिएटिव्ह बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व लायन्स नेत्र रुग्णालय, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने गंगापूर येथे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण सुमारे ८५ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली असून, त्यापैकी २७ रुग्णांना मोतीबिंदू आढळून आला.

या शिबिराचे उद्घाटन लायन्सचे रिजन चेअरपर्सन ला. जयदीप घुगे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष अशोक गुरनाळे, प्रकल्प प्रमुख योगेश धोत्रे, दत्तात्रय देशपांडे, दयाल डिडोरे, जितेंद्र महाजन, अशोक भालेकर,





ज्ञानेश्वर काळे, रंजीत (बापू) चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून समाजोपयोगी उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करत या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले.

सन २०२१ पासून दर महिन्याला मोफत नेत्र तपासणी शिबिरांचे सातत्याने आयोजन करण्यात येत असून, आतापर्यंत सुमारे २५ हजार रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली आहे. यामधील २,००० पेक्षा अधिक गरजू रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या शिबिरास गंगापूर शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. शिबिरात लायन्स नेत्र रुग्णालय, चिकलठाणाचे डॉ. श्यामली जाधव, डॉ. साक्षी खंडागळे यांच्यासह गौतम एकदे, अविनाश सोनवणे, सचिन आडे यांनी सर्व रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विष्णू जगताप, महेश मोरे, प्रभाकर वावरे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी अतुल कुलकर्णी, सतीश शेळके, सुदाम जगताप आदी उपस्थित होते.

# मराठी बालकुमार साहित्य सभा कोल्हापूरचे वाड़्मय पुरस्कार जाहीर



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

कोल्हापूर : सन २०२५ चे बालसाहित्य वाड़्मय पुरस्कार नुकतेच जाहीर झालेले आहेत व वेगवेगळ्या प्रकारात हे पुरस्कार खालीलप्रमाणे आहेत.

बालकथा - झिब्राच्या कथा संजय ऐलवाड, पुणे बालकविता - पावसाचे गाणे अरुण देशपांडे, पुणे बालकादंबरी - मातीला पंख फुटताना डॉ. स्मिता पाटील, मोहोळ, सोलापूर, बालसंकीर्ण - समग्र मराठी साहित्यकृतींचा ... सचिन बेंडकर, पुणे बालसाहित्यिक सेवागौरव पुरस्कार श्री. रवींद्र खैरे, बालसाहित्यिक श्याम कुरळे जीवनगौरव -डॉ. मा. ग. गुरव मा. संपत गायकवाड आदर्श शिक्षक श्री. दीपक क्षीरसागर.

अध्यक्ष - डॉ. श्रीकांत पाटील उपाध्यक्ष श्री. परशराम आंबी, कार्याध्यक्ष - सौ. नसीम जमादार कार्यवाह श्री. संजय कळके संचालक मंडळ यांनी हे पुरस्कार जाहीर केले आहेत व लवकरच एका भव्य कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण केले जाणार आहे असे संचालक मंडळाने सांगितले आहे.




# प्रबोध जोशीच्या व्हायोलिन वादनाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे -** ''संगीत ही आत्म्याची भाषा आहे ती ज्याला समजली त्यांचे जीवन समृद्ध झाल्याशिवाय राहत नाही'' या विधानाची प्रचिती देणारी व्हायोलिन वादनाची मैफिल शनिवार दि. २४ रोजी संध्याकाळी पार पडली. चोखंदळ रसिकांच्या प्रतिसादात रंगत गेलेल्या या मैफलीचे आयोजन ध्वनी आर्टसच्या संचालिका कल्याणी लोखंडे - पंडित यांच्यावतीने बाणेर हिल परिसरात करण्यात आले होते.


निमंत्रित कलावंत प्रबोध जोशी यांनी व्हायोलिन वादनाच्या या मैफिलीसाठी राग बिहागची निवड केली होती. सुश्री स्वप्नाताई दातार यांचा शिष्य असलेल्या प्रबोधने सुरुवातीला विलंबित एकतालातील आलापी, बढत , तानांच्या माध्यमातून रागविस्तार करीत उपस्थित रसिकांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर सब सखियाँ चलो.... ही बंदीश सादर केली. रंग सारी गुलाबी चुनरिया या उपशास्त्रीय रचनेव्दारे मैफिलीत माहोल निर्माण करीत उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळवली. त्यापाठोपाठ दादरा तालात विविध गायकांच्या आवाजातील गाण्यांच्या सुरावटी सादर करीत या युवा कलावंताने मैफलीतील वेगळेपण अधोरेखित केले. निघालो घेऊन दत्ताची पालखी या रचनेव्दारे मैफलीचा समारोप करण्यात आला. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या मैफलीत प्रबोध जोशी याच्या व्हायोलिनवादनाला पं. सुरेश तळवलकर यांचे शिष्य वेदांग जोशी याने अतिशय समर्पक अशी साथसंगत केली. या मैफिलीतील कलावंतांचे स्वागत अश्विनी अनिल लोखंडे यांनी केले तर कल्याणी कुणाल पंडीत हिने आभार मानले.

मैफिलीच्या आयोजनामागील भूमिका सांगताना कल्याणी हिने सांगितले की, भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रसार आणि प्रचार करण्यासोबतच रसिकांची अभिरुची संपन्न करण्याचा ध्वनी आर्टसचा प्रयत्न आहे. सातत्याने अशा प्रकारच्या मैफिलींमधून युवा कलावंतांना प्राधान्य देणार असल्याचे कल्याणी हिने विशेषत्वाने सांगितले.

# राष्ट्रीय निबंध स्पर्धेत श्री प्रकाश भोंगाळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सातारा : कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा यांच्या भाषा मंडळ व छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय लोकशाहीचा अमृत महोत्सव व वंदे मातरम उत्सवाच्या निमित्ताने आयोजित राष्ट्रीय निबंध स्पर्धा सन २०२५-२६ चा बक्षीस वितरण समारंभ २६ जानेवारी २०२६ रोजी सातारा येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठचे कुलगुरू मा.डॉक्टर ज्ञानदेव मस्के हे प्रमुख अतिथी होते तसेच कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलसचिव मा डॉ. विजय कुंभार यांची प्रमुख उपस्थिती होती या कार्यक्रमात इतिहास संशोधक मा इंद्रजीत सावंत



यांची प्रमुख उपस्थिती होती

या राष्ट्रीय निबंध स्पर्धेत देशभरातून निबंध प्राप्त झाले होते भारतीय लोकशाही, सांविधानिक मूल्य, राष्ट्रप्रेम, सामाजिक समता व नागरिकत्वाची जाणीव या विषयावर स्पर्धकांनी सखोल विचार मांडणारे निबंध सादर केल्याचे आपल्या प्रास्ताविकामध्ये भाषा मंडळाचे प्रभारी संचालक प्राध्यापक डॉक्टर सुभाष वाघमारे यांनी सांगितले या स्पर्धेत खुल्या गटातून श्री प्रकाश भोंगाळे राहणार मायणी तालुका खटाव जिल्हा सातारा यांच्या भारतीय लोकशाही पुढील आव्हाने या निबंधाने खुल्या गटातून प्रथम क्रमांक पटकावला त्याबद्दल रोख रक्कम, सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाषा मंडळाचे प्रभारी संचालक प्राध्यापक डॉक्टर सुभाष वाघमारे यांनी स्पर्धा प्रमुख म्हणून तसेच डॉक्टर संजयकुमार सरगडे यांनी स्पर्धा समन्वयक म्हणून प्रभावी कार्य केले. यावेळी निबंध स्पर्धेच्या परीक्षकांचा सुद्धा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे आभार माननीय श्री उमाप सर यांनी मांडले. राष्ट्रीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला म्हणून श्री प्रकाश भोंगाळे यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

# ५ दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करण्याच्या मागणीसाठी बँक कर्मचाऱ्यांच्या संपाला प्रचंड प्रतिसाद

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पुणे - युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स यांच्या नेतृत्वाखाली आज देशभरातील बँक कर्मचाऱ्यांनी ५ दिवसांचा बँकिंग आठवडा तात्काळ लागू करावा, तसेच इतर दीर्घकाळ प्रलंबित सेवासंबंधी मागण्यांसाठी एकदिवसीय संप पुकारला होता.

या संपाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्यामुळे बँकिंग व्यवहार मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले.




UFBU चे कन्व्हिनर श्री. विठ्ठल माने यांनी सांगितले की, पुणे येथे एसबीआय ट्रेझरी ब्रँच, पुणे येथे सुमारे ४०० बँक कर्मचाऱ्यांनी एकत्र येत जोरदार निदर्शने केली. यावेळी काम जीवन समतोल, कामगारांचा सन्मान तसेच शासन व प्रशासनाकडून दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी यासाठी तीव्र घोषणा देण्यात आल्या.

या आंदोलनाला प्रमुख नेते श्री. सतीश टाके ,श्री संतोष गदादे श्री. महेश ननावरे, श्री. प्रमोद शिंदे, श्री. धोंडिराम गायकवाड, श्री. शिवप्रसाद भामरे, श्री राजेश मुळे ,श्री. कल्याणकर, श्री. कृष्णा बोरूकर, श्री. सचिन वायकर, श्री. अमोल तांबे, श्री. श्री शिरीष राणे, श्री. अल्ताफ मुलानी, श्री. गोपी कृष्णा, श्री. मनोहर, श्री. लोकेश कुमार, श्री. मिनिनाथ नेरल ,श्री महादेव फरांदे,श्री विजय पाटील यांनी संयुक्तपणे आपली भूमिका मांडली.

नेत्यांनी सांगितले की, भारत डिजिटल झाला असून बँकिंग सेवा २४×७ उपलब्ध आहेत, मात्र बँक कर्मचारी अजूनही जुनाट ६ दिवसांच्या कामकाज पद्धतीत काम करण्यास बाध्य आहेत. सरकारी कार्यालये आणि कॉर्पोरेट क्षेत्रासह अनेक क्षेत्रांत आधीच ५ दिवसांचा आठवडा लागू करण्यात आला आहे. त्यामुळे बँक कर्मचाऱ्यांची ही मागणी पूर्णपणे न्याय्य व फार पूर्वीच मान्य होणे आवश्यक होती.

युनियन प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, ५ दिवसांचा बँकिंग आठवडा लागू केल्यास उत्पादकता कमी होणार नाही, तर उलट कार्यक्षमता, जबाबदारी, कर्मचारी कल्याण आणि ग्राहक सेवा अधिक सक्षम होईल. मात्र सरकार व इंडियन बँक्स असोसिएशन यांनी वारंवार दिलेल्या आश्वासनांनंतरही अद्याप कोणताही ठोस निर्णय न झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

UFBU ने इशारा दिला आहे की, जर मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेतला गेला नाही, तर येत्या काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. हा संप शांततेत पार पडला. मात्र सरकार व बँक व्यवस्थापनांना एक ठाम संदेश देण्यात आला.

**हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)** E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559